# जाहिर सुचना

१. मा. कक्ष अधिकारी,राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र रानिआ/नप-२०१७/प्र.क्र१०/का-६दिनांक १३.०६.२०१७ नुसार नाशिक जिल्हयातील इगतपुरी त्रंबक या नगरपरिषदांच्या प्रभाग रचना,आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहिर करण्यात आला आहे.

२. इगतपुरी व त्रंबक या नगरपरिषदांची प्रभाग रचना प्रसिध्द करण्यापूर्वी नगरपरिषदांची सभा आयोजित करुन सोडत पध्दतीने अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीमधील स्त्रियांसाठी राखीव ठेवावयाच्या जागा,नागरिकांच्या मागासवर्गासाठी (त्यातील स्त्री आरक्षणासह) राखीव ठेवावयाच्या जागा व उर्वरित स्त्रियांसाठी राखीव ठेवावयाच्या जागा यांचे आरक्षण निश्चित कारणेकामी उपजिल्हाधिकारी दर्जाचे महसुली अधिकारी यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

. आरक्षणाची सोडत दिनांक २०/०७/२०१७ (गुरुवार) रोजी संबधीत नगरपरिषदेने निश्चित केलेल्या खालील प्रमाणे ठिकाणी होणार आहे.

| अ.क्र | नगरपरिषदेचे नाव | दिनांक | आरक्षण सोडतीचे ठिकाण | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | इगतपुरी | दिनांक २०/.०७/.२०१७ (गुरुवार) | इगतपुरी नगरपरिषद सभागृह | उपविभागीय अधिकारी इगतपुरी –त्रंबक उपविभाग |
| २ | त्रंबक | दिनांक २०./०७/.२०१७ (गुरुवार) | त्रंबक नगरपरिषद सभागृह | उपजिल्हाधिकारी भूसंपादन पाटबंधारे क्र.१ नाशिक |

**नगरपरिषद आरक्षणाचा व प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | नगरपरिषद सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे. (अनुसुचित जाती,अनुसुचित जमातीमधील महिला,नागरिकांचा मागासप्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | मुख्याधिकारी इगतपुरी/त्रंबक | २०/०७/१७ (गुरुवार) |
| | ब) हरकती व सुचना तसेच सुनावणी | | |
| १ | प्रारुप प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे व सदस्यपदांच्या आरक्षणाची (अधिसुचना कलम १० नुसार) रहिवाशांच्या माहितीसाठी व हरकती व सुचना मागविणेकरिता वृत्तपत्रात व स्थानिक पातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषद वेबसाईटवर प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी, नाशिक | २४/०७/.२०१७ (सोमवार) पर्यत |
| २ | हरकती व सुचना मागविण्याचा कालावधी | -- | २४/०७/२०१७ (सोमवार) ते ३१/०७/२०१७ (सोमवार) पर्यत |
| ३ | प्राप्त हरकती व सुचनांवर सुनावणी देणे | जिल्हाधिकारी, नाशिक | ०५/०८/२०१७ (शनिवार) पर्यत |
| ४ | हरकती व सुचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन संबधीत विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,नगरपरिषद प्रशासन नाशिक विभाग यांचेकडेस अहवाल पाठविणे | जिल्हाधिकारी, नाशिक | ०८/०८/२०१७ (मंगळवार) पर्यत |
| ५ | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे | मा.विभागीय आयुक्तनाशिक | ११/०८/२०१७ (शुक्रवार) पर्यत |

**क) अंतिम प्रभाग रचना**

(प्रभाग निहाय एकुण लोकसंख्या,अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीची लोकसंख्या तसेच आरक्षणासह)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसुचना वृत्तपत्रात व स्थानिक पातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषद वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी,नाशिक | १६/०८/२०१७ (बुधवार) पर्यत |

स्वाक्षरीत///
**जिल्हाधिकारी नाशिक**

जा.क्रकक्ष२/नपा-२/१५०९/२०१७
जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक
नाशिक दिनांक १३/०७/२०१७

जिल्हाधिकारी नाशिक करिता